# फळसेवाडी हितकारी संस्था
## विशेष सर्वसाधारण सभा

विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस

उपरोक्त संस्थेच्या सर्व सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 03 मार्च 1996 रोजी सायंकाळी ठीक 4:00 वाजत शिरोडकर हायस्कूल, परळ, मुंबई – 400 012 येथे खालील कामकाज करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे.

सभेपुढील कामे

1. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन व मंजूरी
2. स्थानीक आमदार श्री नारायण तातू राणे यांचे महाराष्ट्र राज्याच्या दुग्धविकास व पशुसंर्वधन खात्याचे मंत्री म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करणे.
3. ग्रामपंचायती मार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या विकासीत चुली घेण्याबाबत निर्णय घेणे.
4. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी इतर कामे करणे.

आपला सहकारी

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

टिप :- दिनांक 18 फेब्रुवारी 1996 च्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे सत्कार समारंभासाठी रु.50/- रक्कम फक्त सर्व सभासदांनी सोबत आणावी.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(51 to 55)

# फळसेवाडी हितकारी संस्था

## विशेष सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 03 मार्च 1996
**स्थळ** : शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012.

### उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 11. श्री उदय भगवान राणे |
| 2. श्री भास्कर दौलत राणे | 12. श्री अंकूश महादेव राणे |
| 3. श्री गुरुनाथ धोंडू राणे | 13. श्री भगवान रामचंद्र साटम |
| 4. श्री वासुदेव बाबू राणे | 14. श्री अभयनाथ भगवान साटम |
| 5. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 15. श्री प्रभाकर श्रीधर राणे |
| 6. श्री श्रीधर आत्माराम राणे | 16. श्री विठोबा नाना राणे |
| 7. श्री दत्ताराम विष्णु साटम | 17. श्री यशवंत तुकाराम सावंत |
| 8. श्री भ. सं. राणे | 18. श्री उत्तम वामन राणे |
| 9. श्री धोंडू रघूनाथ राणे | 19. श्री दिनेश अनंत राणे |
| 10. श्री प्रताप विठोबा राणे | |

उपरोक्त संस्थेची सभा शिरोडकर हायस्कूल, परेल, मुंबई – 400 012 या ठिकाणी रविवार दिनांक 03 मार्च 1996 रोजी अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या सभेस वरील 19 सभासद उपस्थित होते. चिटणीसांनी उपस्थितांचे स्वागत केले. सभेचे काम सुरू होण्यापूर्वी संस्थेच्या वतीने कै गणपत सावंत, कै भगवान सावंत व कै रुक्मीणी सावंत या दिवंगत आत्म्यांना संस्थेच्या वतीने 2 मिनीटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

1. सभेच्या पहील्या विषयपत्रिकेनुसार मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन केले व त्यावर चर्चा होऊन ते वाचन मंजूर केले.
2. सभेच्या दुसऱ्या विषयानुसार आमदार श्री नारायण तातू राणे दुग्धविकास व पशुसंर्वधन मंत्री यांचा सत्कार समारंभ कसा करावा यावर चर्चा झाली व खालील निर्णय घेण्यात आले.
    - दिनाक 18 एप्रिल 1996 रोजी ठरल्याप्रमाणे लवकरात लवकर सत्कार घेणे किंवा दिनांक 24 मार्च 1996 रोजी हा सत्कार घ्यावा
    - रु.50/- ही वर्गणी सर्व सभासदांनी द्यावी.
    - कमी पडल्यास संस्थेच्या फिक्स डिपॉझिटमधून खर्च करावा.
    - मा अध्यक्ष श्री प्रताप विठोबा राणे यांनी दिनांक 24 मार्च 1996 रोजी मा नामदारांची तारीख मुक्रर करुन घ्यावी व हॉल बुक करावा.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-04-(51 to 55)

- वरवडे-फळसेवाडीतील बंधू-भगिनीनां या सत्काराचे निमंत्रण द्यावे. या मुद्यावरून श्री वासुदेव बाबु राणे, श्री दत्ताराम विष्णु साटम, श्री भास्कर दौलत राणे, श्री अविनाश कृष्णाजी राणे, श्री अभयनाथ भगवान साटम इत्यांदीनी विशेष भाग घेतला.

3. तिसऱ्या मुद्याप्रमाणे वाडीतील सुधारीत चुली मिळणेबाबत चर्चा झाली. चिटणीस श्री सुनिल सदानंद राणे यांनी परिस्थितीची पूर्ण कल्पना सभाग्रहास दिली. आर्थिक खर्चाची बाजू देखील समजावून सांगण्यात आली व त्यासाठी ग्रामपंचायतीस लागणारे निवेदन देखील प्रत्येक सभासदांने भरून देण्यास सांगण्यात आले.
4. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय – या विषयांमध्ये नामदार श्री नारायण तातू राणे (मंत्री महोदय, पालक मंत्री) या नात्याने देण्यात येणारे निवेदनावर सर्व उपस्थित सभासदांच्या सह्या घेण्यात आल्या. व ती निवेदने सभासदांना चिटणीसांनी वाचून दाखविली. तसेच माननिय दिनेश अनंत राणे (उद्योगपती) यांनी सभेस उपस्थिती दाखविली त्यांचे देखील संस्थेने स्वागत केले व त्यांना अध्यक्षांनी दोन शब्द बोलण्यास व मनोगत व्यक्त करण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणे त्यांनी आपले मनोगत योग्य शब्दात व सर्व सभासदांशी प्रेम दाखवत व्यक्त केले. या विषयामध्ये चिटणीसांनी माननिय उद्योगपती श्री दिनेशजी राणे यांना शाळेवर कौले घालणे या विषयासंबधी पाठविलेले पत्र वाचून दाखविले व त्याबाबतीत श्री दिनेश राणे यांनी योग्य विचार करीन असे आश्वासन दिले. तसेच ज्या सभासदांना शाळेसाठी आणखी काही सहाय्य करायचे असेल तर ते करावे असे आवाहन केले.

यानंतर वाडीतील विविध विषयांवर (सुधारणा) बाबत खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा झाली. चिटणीसांनी सर्वसाधारण सभेस जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहावे, तरुणांनी पुढे यावे असे विनम्र आवाहन केले.

या सभेच्या निमित्ताने माननिय श्री दिनेश अनंत राणे तसेच त्यांचे कुटुंबिय व वाडीतील सर्व सभासद उपस्थित राहीले त्याबद्दल सर्वांचे पुन्हा एकदा आभार मानून सभा संपल्याचे अध्यक्षांनी घोषित केले. या प्रसंगी चहापाण्याच्या खर्च माननिय श्री उदय भगवान राणे, खजिनदार यांनी केला त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

सभा सायंकाळी 7:15 वाजता संपली.

---